# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत
(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. ८३२ ए,भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे ४११००४

दूरध्वनी क्र.:-020 - 29709617 वेबसाइड:-mscepune.in ई-मेल :-mscegcctbc@gmail.com


जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा/पुनर्परीक्षाएप्रि२६/२०२६/ 1145

दिनांक :- 13/ 3 /२०२६.

प्रति,

**संस्थाचालक (सर्व)**
**शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय : शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा - संगणक लघुलेखन (GCC- Computer Shorthand) परीक्षा शुल्क वाढीबाबत.**

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासकम) मान्यता व संचालन नियम १९९१ ची सुधारीत नियमावली २०२३.
२) राज्य समिती सभा क्र. १४४ दि.०५/०२/२०२६.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा - संगणक लघुलेखन (GCC- Computer Shorthand) या परीक्षा वर्षातून दोन सत्रांमध्ये घेतल्या जातात.

परीक्षा परिषदेकडून परीक्षांमध्ये वेळोवळी सुधारणा करण्यात येत आहेत - जसे विद्यार्थ्यांना अधिकच्या सरावासाठी LMS Software, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत बायोमॅट्रिक प्रणालीव्दारे तपासणी करणे, संवेदनशील केंद्रांवर CCTV व Face recognition यंत्रणा बसविणे यास परीक्षा परिषदेस मोठया प्रमाणावर खर्च करण्यात आलेला आहे तसेच संदर्भिय नियमावलीनुसार दर तीन वर्षांनी शुल्कामध्ये १० % वाढ करण्यास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | सेवा | जुने शुल्क | सुधारीत शुल्क |
|---|---|---|---|
| १. | शासकीय वाणिज्य टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षेसाठी संस्थाना परिषदेशी संलग्नता देणे (संस्था कोड) | रु.१०००/- | **रु.११००/-** |
| २. | शासकीय वाणिज्य टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षेसाठी संस्थाना नुतनीकरण शुल्क (प्रति वर्ष) | रु.१०००/- | **रु.११००/-** |
| ३. | लघुलेखन (सर्व विषय )– परीक्षा शुल्क | रु.१०००/- | **रु.११००/-** |
| ४. | बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी, हिंदी व इंग्रजी ३० व ४० श.प्र.मि. व इंग्रजी ५० व ६० श.प्र.मि (कालावधी ६ महिने) | रु.१०००/- | **रु.११००/-** |

वरील प्रमाणे शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जानेवारी - २०२६ ची पुनर्परीक्षा एप्रिल २०२६ व पुढील परीक्षांसाठी परीक्षा शुल्कामध्ये व सेवाशुल्कामध्ये १० % वाढ करण्यात येत आहे याची नोंद घ्यावी.

13/3/26

**(डॉ. नंदकुमार बेडसे- भा.प्र.से.)**
**अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०४**

**प्रत माहितीस्तव :-**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सर्व.
३. शिक्षण निरीक्षक, बृन्हमुंबई (उत्तर/दक्षिण/पश्चिम)